महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

## पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# घरच्या घरी पशुखाद्य निर्मिती







### पशुखाद्य (खुराक) कसे असावे ?

- खाद्य रूचकर असावे.
- खाद्यात प्रथिनांचे प्रमाण १८ ते २०% (पचनिय प्रथिने १०-१४%) असावे.
- खाद्यात पचनिय घटक ७० ते ७५% असावे.
- खाद्यात विविध घटकांचा समावेश असावा.

### पशुखाद्य कसे तयार करावे ?

खालील तक्त्याप्रमाणे खाद्य घटक घेऊन घरच्या घरी विविध खाद्यप्रकार तयार करता येते. खाद्य घटकांची उपलब्धता, गुणवत्ता आणि किंमत या बाबीं पशुपालकांनी खाद्य तयार करतांना विचारात घ्याव्यात.

#### पशु खाद्यातील विविध घटक आणि त्यांचे प्रमाण

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १) | भरडलेले धान्य (मका, ज्वारी, बाजरी, गहू) | २५-३५% |
| २) | धान्याचा कोंडा (ज्वारी, बाजरी, गहू) | १०-२५% |
| ३) | पेंड (सरकी, अंबाडी, सुर्यफूल, सोयाबीन, शेंगदाणा) | २५-३०% |
| ४) | चुणी (तूर, मूग, हरभरा, उडीद) | १५-२०% |
| ५) | खनिज (क्षार) मिश्रण | २% |
| ६) | मीठ | १% |

#### उदाहरण : पशुखाद्य प्रकार - १

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १) | मका/ज्वारी भरडा | ४७% |
| २) | गव्हाचा कोंडा | १०% |
| ३) | सरकी पेंड | ३०% |
| ४) | उडीद चुणी | १०% |
| ५) | खनिज (क्षार) मिश्रण | २% |
| ६) | मीठ | १% |

(पचनीय प्रथिनांचे प्रमाण १०-१२%)

{ वरील खाद्य भाकड गायी, कमी दूध उत्पादक गायी-म्हशी आणि बैलांना द्यावे. }

#### उदाहरण : पशुखाद्य प्रकार - २

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १) | मका भरडा | ३०% |
| २) | गव्हाचा कोंडा | ७% |
| ३) | सरकी पेंड | ५०% |
| ४) | उडीद चुणी | १०% |
| ५) | खनिज (क्षार) मिश्रण | २% |
| ६) | मीठ | १% |

(पचनीय प्रथिनांचे प्रमाण १२-१४%)

{वरील खाद्य अधिक दूध देणाऱ्या गायी-म्हशींना द्यावे.}

### पशुखाद्य जनावरांना किती प्रमाणात द्यावे ?

- भाकड/दुधाळ देशी/संकरीत गायी-म्हशी आणि बैलांना केवळ शरीरपोषणासाठी प्रतिदिन दिड किलो पशुखाद्य द्यावे.
- गायींना प्रत्येक २.५-३ लिटर तर म्हशींना प्रत्येक २-२.५ लिटर दूध उत्पादनामागे १ किलो पशुखाद्य द्यावे.
- गाभण गायी-म्हशींना शेवटच्या तीन महिन्यात १.५ किलो जादा खुराक द्यावा.

**तयार केलेले पशुखाद्य जनावरांना देण्यापूर्वी रात्रभर पाण्यात भिजवून दिल्यास पाचकता वाढते.**

**जनावरांना द्या संतुलित पशुखाद्य ।**
**होईल अधिक उत्पादन घेणे साध्य ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर